SpellIndia
INDIA's No. 1
SPELLING BEE
Preparatory Study Material Provider
www.phonicsestore.com

ICSE ACADEMY
www.spellbeeacademy.com

Pati's

# PREPARE for ICSE

## Class 10

# Marathi

Questions ONLY

A Collection of Questions from Prelim exam papers of various ICSE schools

Pati's

# ICSE ACADEMY: How to Prepare for ICSE Class 10 exams

https://www.spellbeeacademy.com/icse.html

## How to Prepare for ICSE Class 10 exams : Free Resources

Please click on subject to proceed further.

We will keep adding resources here till "March 2026".

So, save this link, keep visiting and stay updated.

( Resources include : Syllabus, Past Year Papers, Specimen Papers, Competency based Questions, Books pdf downloadable, 350+ Term Papers / Prelim Papers of various schools - across subjects, etc. )

01 English Literature
02 English Language
03 Geography
04 History & Civics
05 Physics
06 Chemistry
07 Mathematics
08 Biology
09 Computer Applications
10 Physical Education
11 Hindi
12 Commercial Studies
13 Economics
14 Technical Drawing
15 Environmental Science
16 Home Science
17 Gujarati
18 Marathi
19 French

**SCAN QR code to buy the book at amazon NOW.**












**Scan QR code** for Free Access to
500+ Prelim Papers across 20 subjects




















Pati's
ICSE ACADEMY

# Prepare for ICSE CLASS 10
# Marathi

## Free Resources

## SCAN QR CODE Now

ICSE ACADEMY

# Set 3a : Question Papers

1. Bhaktivedanta Swami Mission, Mumbai

2. Arya Vidya Mandir, Bnadra West, Mumbai

3. Euro School, Mumbai

2025-2026 - Prelim 1

Pati's
ICSE ACADEMY

# Question Paper 1

## BHAKTIVEDANTA SWAMI MISSION SCHOOL

**PRE - PRELIMINARY EXAMINATION [2025 – 2026]**

**MARATHI**

DATE: 29-11-20225
STD: X

MARKS : 80
TIME: 2 Hrs

*Answer to this paper must be written on the paper provided separately.*
*You will not be allowed to write during the first15 minutes.*
*This time is to be spent in reading the question paper.*

---

*This paper comprises of section A and section B*
*Atempt all the questions*
*The intended marks for questions or parts of questions are given in brackets [ ]*

### SECTION A - [व्याकरण 40 marks]

**(Attempt all questions from this Section)**

**प्र.1.खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर निबंध लिहा. ( कोणताही -1 )** **[8]**

1. आवडता खेळाडू
2. भारतीय सैनिक
3. माझे बालपण
4. झाडाचे महत्व

**प्र.2.अ)खालीलपैकी योग्य समानार्थी शब्द लिहा. ( कोणतेही - 4 )** **[4]**

1. निवांत -
2. नवरी-
3. रुक्ष -
4. संगती -
5. संथ -

**ब) खालीलपैकी योग्य विरुद्धार्थी शब्द लिहा. ( कोणतेही - 4 )** **[4]**

1. सोपे ×
2. सुरुवात ×
3. देशी ×
4. सावध ×
5. शक्य ×

**क) खालीलपैकी योग्य वचन बदला. ( कोणतेही - 4 )** **[4]**

1. दांडी -
2. रांग -
3. वही -
4. रान -
5. वाटी -

Pati's
ICSE ACADEMY

Pati's
ICSE ACADEMY

ड) खालीलपैकी योग्य लिंग बदला. (कोणतेही - 4) [4]

1. राजा -
2. लेखक -
3. शिक्षक -
4. मामा -
5. पती -

प्र.3.अ) खालील वाक्यातील शब्दयोगी अव्यय अधोरेखित(underline)करून वाक्य पुन्हा लिहा. [2]

1. दाजीसाहेबांनी त्याला खुर्चीवर बसवले. 1
2. मुलांच्या कॉलेजसमोर बस स्टॉप आहे. 1

ब) खालील वाक्यातील क्रियाविशेषणअव्यय अधोरेखित( underline)करून वाक्य पुन्हा लिहा. [2]

1. कॅक्टस कधीच भरभर वाढत नाही. 1
2. आम्ही नेहमी मैदानावर खेळायला जातो. 1

क) खालील वाक्यातील उभयान्वयी अव्यय अधोरेखित( underline) करून वाक्य पुन्हा लिहा. [2]

1. थंडी वाजत होती म्हणून त्याने मफलर कानाला बांधले. 1
2. लोक त्याचे पाणी काढत आणि तहान शमवण्यासाठी पाणी पीत असत. 1

ड) खालील वाक्यातील केवलप्रयोगी अव्यय अधोरेखित( underline)करून वाक्य पुन्हा लिहा. [2]

1. अरेरे ! त्याला फारच लागले होते. 1
2. बापरे ! एवढा मोठा साप पाहून आम्ही सर्व घाबरलो. 1

इ) खालील वाक्यातील काळ ओळखून शब्द अधोरेखित(underline) करून वाक्य पुन्हा लिहा.[2]

1. सर्व खेळाडू आनंदाने स्वाक्षरी देत होते. 1
2. माझ्या मनात लहानपणी पेरले गेलेले बीज एक दिवस उगवेल. 1



Pati's
ICSE ACADEMY

Pati's ICSE ACADEMY

**प्र.4. खालील उतारा वाचून त्यावर विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.** **[6]**

संविधान [Constitution]म्हणजे एखाद्या देशाचा कारभार चालवण्यासाठीचे मूलभूत नियम आणि तत्त्वांचा संच होय. भारतीय संविधान हे देशाची राजकीय चौकट, सरकारची रचना, नागरिकांचे मूलभूत अधिकार आणि कर्तव्ये निश्चित करते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना भारतीय संविधानाचे शिल्पकार म्हटले जाते. भारतीय संविधान हे जगातील सर्वात विस्तृत लिखित संविधानांपैकी एक आहे. संविधानात सार्वभौमत्व, समाजवाद, धर्मनिरपेक्षता, लोकशाही, प्रजासत्ताक आणि न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता यांसारख्या मूल्यांचा समावेश आहे. हे संविधान नागरिकांच्या मूलभूत हक्कांचे आणि कर्तव्यांचे संरक्षण करते.दरवर्षी २६ नोव्हेंबर हा दिवस 'संविधान दिन' म्हणून साजरा केला जातो, कारण याच दिवशी संविधान स्वीकारले गेले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे संविधान मसुदा समितीचे अध्यक्ष होते, त्यामुळे त्यांना संविधानाच्या निर्मितीमध्ये प्रमुख भूमिका मिळाली. त्यांच्या विचारांचा संविधानावर मोठा प्रभाव असल्यामुळे ते भारतीय संविधानाचे प्रमुख शिल्पकार मानले जातात. उपेक्षित गटांसाठी समानता आणि न्यायाची हमी देणारी चौकट तयार करण्यामध्ये त्यांचे योगदान महत्त्वाचे आहे.

**प्रश्न :-**

1. संविधान म्हणजे काय ? 1
2. भारतीय संविधान काय निश्चित करते ? 1
3. भारतीय संविधानाचे शिल्पकार कोण आहेत ? 1
4. संविधानात कोणत्या मूल्यांचा समावेश आहे ? 1
5. संविधान दिन कधी साजरा केला जातो ? 1
6. वरील उताऱ्याला योग्य शीर्षक द्या. 1

## SECTION - B ( 40 Marks )

**(Attempt all questions from this Section)**

**प्र.5. अ) खालील प्रश्नांची <u>थोडक्यात उत्तरे</u> लिहा ( <u>कोणतेही 4</u> )** **[12]**

1. सग्वारो कॅक्टसची वैशिष्ट्ये स्पष्ट करा. 3
2. लेखकाच्या वडिलांची शिस्त जाणवलेले प्रसंग पाठाच्या आधारे तुमच्या शब्दात लिहा ? 3
3. पृथ्वीला वाचवण्यासाठी काय काय करावे,असे कवयित्रीला वाटते ते लिहा. 3
4. औक्षण या कवितेतील आशय सौंदर्य तुमच्या शब्दात स्पष्ट करा. 3
5. 'झाडापासून आनंदी जगणे शिकावे' या विधानातील विचार स्पष्ट करा. 3
6. ऊर्जा शक्तीचा जागर या पाठात लेखक डॉक्टर माशेलकर यांनी आपल्या परिस्थितीचे वर्णन कसे केले आहे ? 3



Pati's ICSE ACADEMY

प्र.6.अ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. ( कोणतेही 6 ) [6]

1. चंदू बोर्डे यांच्या वडिलांची बदली कोणत्या गावी झाली ? 1
2. लेखकाचे बालपण कुठे गेले ? 1
3. वाळवंटी प्रदेश म्हणजे काय ? 1
4. जुनी बॅट किती रुपयांची होती ? 1
5. उत्तर पत्रिकेची किंमत किती होती ? 1
6. डोळे भरून काय पहावे असे कवी म्हणतात ? 1
7. कोण धान्य देत नाही ? 1

ब) रिकाम्या जागी योग्य शब्द भरून वाक्य पुन्हा लिहा . [6]

1. काळी -------------जगवू. 1
2. पिंप कॅक्टसला फार --------------------------- असतात. 1
3. त्या क्षणापासून मी मात्र कधीच------------------- चुकवली नाही. 1
4. दीनदुबळ्यांचे असे तुला एकच -------------------. 1
5. आमचे हायस्कूलही ------------------होते. 1
6. एक संथ ---------------------- दडलेले असते. 1

क) खालील वाक्य चूक की बरोबर ते लिहा . [6]

1. कॅक्टस हे आफ्रिका खंडातील झाड आहे. 1
2. लेखकाचे चुलते वाय. एम. सी. ए. च्या कंपाउंड मध्ये राहत होते . 1
3. चंदू बोर्डे यांना हॉकी फार आवडत होते. 1
4. रेड इंडियन्स लोक कॅक्टस चवीने खात असत. 1
5. झाडांना पालवी फुटत नाही . 1
6. झाड बसते ध्यानस्थ ऋषी सारखे मौन व्रत धारण करून. 1



Pati's ICSE ACADEMY

प्र.7.अ) खालील प्रश्नांची एका शब्दात उत्तरे लिहा. [4]

1. क्षणभर हिरवेगार होणारे -- 1
2. वडिलांचा मासिक पगार -- 1
3. खेतवाडी येथील निवास -- 1
4. मुळावरचे घाव मुकाट सहन करणारे -- 1

ब) खालील वाक्यप्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा. ( कोणतेही 3 ) [3]

1. अभाव असणे -- 1
2. आनंद गगनात न मावणे -- 1
3. राखण करणे -- 1
4. हेवा वाटणे -- 1

क) खालील शब्दांपासून योग्य वाक्य बनवा. ( कोणतेही- 3 ) [3]

1. स्वाक्षरी -- 1
2. मधुर -- 1
3. संस्कार -- 1
4. कष्ट -- 1

<><><><><><>------------------------------------<><><><><><>



ICSE ACADEMY

Pati's
ICSE ACADEMY

# Question Paper 2

## ARYA VIDYA MANDIR BANDRA WEST

Std : X | PRE - PRELIMINARY REVIEW - DECEMBER 2025 | Marks: 80

MARATHI

Date: 5.12.25 | Time: 3 Hours

**Answers to this paper must be written on the paper provided separately.**
You will **not** be allowed to write during the first **15** minutes.
This time is to be spent in reading the question paper.
**The time given at the head of this paper is the time allowed for writing the answers.**

This paper comprises two sections. **Section A** and **Section B.**
Attempt **all** the questions from **Section.**
The intended marks for the questions or parts of questions are given in brackets [ ].
This paper consists of 8 printed pages

### SECTION –A (40 Marks)

*Attempt **all** questions*

**Question 1**

Write a short composition in Marathi of approximately 250 words on any one of the following topics : - [15]

**खाली दिलेल्या विषयापैकी कोणत्याही एका विषयावर सुमारे २५० शब्दांचा संक्षिप्त निबंध लिहा**

(i) आळस म्हणजे काम न करण्याची किंवा टाळाटाळ करण्याची प्रवृत्ती - माणसाच्या प्रगतीचा सर्वात मोठा शत्रू - शिक्षण, काम आणि जीवनात अपयश - संधी हातातून निसटणे- समाजात प्रतिष्ठा कमी होणे - सदैव कामात व्यग्र असणे, नाविन्य असणे, उत्साही असणे - सकारात्मक असणे आवश्यक - या ‘आळशी’ वृत्तीबद्दल आपले मत व्यक्त करा.

(ii) बालपण हे आयुष्यातील सर्वात आनंदी आणि काळजीमुक्त दिवस - त्यातील काही प्रसंग आयुष्यभर लक्षात राहतात. - शाळेत / सहलीला /घरात/ नात्यात / मैत्रीत घडलेला विशेष प्रसंग - आनंद, हशा, थोडा भीतीचा किंवा उत्साहाचा क्षण - त्या प्रसंगातून काहीतरी नवे शिकणे, अनुभवणे - अशाच बालपणातील आठवणीच्या प्रसंगाचे वर्णन करा.


(iii) परीक्षा ही विद्यार्थ्यांच्या ज्ञानाचे मूल्यमापन करणारी प्रक्रिया - ‘परीक्षा रद्द झाल्या तर …… शिक्षणाच्या व्यवस्थेत मोठा बदल - सुरुवातीला आनंद - नंतर चिंता आणि गोंधळ निर्माण - मेहनती विद्यार्थ्यांवर अन्याय - पुढील प्रवेश प्रक्रिया अडचणीत - शिक्षणाची गुणवत्ता कमी - विद्यार्थ्यांच्या प्रगतीचे मूल्यमापन कसे करावे हा प्रश्न निर्माण - शिस्त आणि अभ्यासाची सवय कमी - ‘परीक्षा रद्द झाल्या तर........ या विषयावर कल्पना विस्तारात्मक निबंध लिहा.



Pati's
ICSE ACADEMY

(iv) 'पुढच्यास ठेच मागचा शहाणा ' या म्हणीचा अर्थ उदाहरणांच्या माध्यमातून स्पष्ट करा किंवा त्यावर आधारित गोष्ट लिहा.

(v) पुढे दिलेले चित्र पहा व त्याआधारे आपल्या मनात कोणते विचार येतात .... त्याचे वर्णन करा.



Question 2

Write a letter in Marathi of approximately 120 words on any one of the topics given below

-

(7)

खाली दिलेल्या विषयांपैकी कोणत्याही एका विषयावर सुमारे १२० शब्दापर्यंतचे पत्र मराठीत लिहा.

(i) जवळ जवळ दोन- तीन वर्षांनंतर तुम्ही तुमच्या गावाला गेला होता. तेव्हा आजीने घेतलेली काळजी, प्रेम, लाड याविषयी मनात दाटून आलेल्या भावना आजीला पत्राने कळवा व तिचे आभार मानणारे पत्र लिहा.

किंवा

(ii) तुमच्या शाळेतील ग्रंथालयासाठी हव्या असलेल्या पुस्तकांची मागणी करणारे पत्र पुस्तक विक्रेत्यास लिहा.

Pati's ICSE ACADEMY

Pati's
ICSE ACADEMY



## Question 3

Read the passage given below and answer in Marathi the questions that follow, using your own words as far as possible (10)

**खाली दिलेला उतारा नीट काळजीपूर्वक वाचा आणि त्यावर आधारलेल्या प्रश्नांची उत्तरे तुमच्या स्वतःच्या शब्दांत मराठीत लिहा.**

संस्कार म्हणजे मनुष्याच्या जीवनातील नैतिक आणि चारित्र्यपूर्ण मूल्यांचा पाया होय.
संस्कारांमुळे मनुष्याचे व्यक्तिमत्त्व उजळते आणि तो समाजात आदर्श ठरतो. लहानपणापासूनच पालक, शिक्षक आणि मोठी मंडळी आपल्याला चांगले संस्कार देतात.
घरात मिळणारे संस्कार हेच व्यक्तीच्या आयुष्याचे पहिले शिक्षण असते. संस्कारांमुळे माणूस नम्र, प्रामाणिक, दयाळू आणि जबाबदार बनतो. चांगले संस्कार असलेली व्यक्ती कधीही चुकीचा मार्ग स्वीकारत नाही. ती इतरांचा आदर करते, सत्य बोलते आणि न्यायाचे पालन करते. संस्कार हे माणसाला चांगले-वाईट यातील फरक समजायला शिकवतात. ते मनुष्याला समाजात सन्मानाने जगायला प्रेरणा देतात. संस्कारांमुळे माणूस आपल्या कुटुंबाचा आणि देशाचा अभिमान बनतो. शाळेत शिक्षक आपल्याला शिस्त, प्रामाणिकपणा आणि मेहनतीचे संस्कार देतात. संस्कार म्हणजे फक्त वर्तन नव्हे, तर विचारांची शुद्धताही आहे. चांगल्या संस्कारांमुळे आपले जीवन सुखी आणि समाधानकारक होते. वाईट संस्कार माणसाला चुकीच्या मार्गावर नेतात. म्हणून नेहमी चांगल्या गोष्टी आत्मसात कराव्यात. संस्कारांची शिकवण आयुष्यभर उपयोगी पडते. पालक आणि गुरुजन हे संस्कारांचे मूळ स्रोत आहेत.
संस्कार म्हणजे माणसाच्या आयुष्याचा खरा अलंकार होय. संस्कारवंत माणूस समाजात प्रेम, शांतता आणि ऐक्य निर्माण करतो. संस्कार हेच व्यक्तीचे खरे सौंदर्य आणि यशाचे रहस्य आहे.

१. संस्कार म्हणजे काय ते उदहारणासह स्पष्ट करा [2]

२. पालक आणि शिक्षक संस्कार देण्यात कोणती भूमिका बजावतात? [2]

३. चांगल्या संस्कारांमुळे व्यक्तीला काय लाभ होतो? [2]

४. वाईट संस्कार माणसाला कोणत्या मार्गावर नेतात?विस्तारित रुपात लिहा. [2]

५. "संस्कार हेच माणसाचे खरे सौंदर्य आहे" — या वाक्याचा अर्थ स्पष्ट करा. [2]

Pati's
ICSE ACADEMY

Pati's ICSE ACADEMY



Question 4

Choose the correct answer from the options given:- [8]

दिलेल्या पर्यायांतून अचूक उत्तराची निवड करा.

i) भुंगा व पोपट या शब्दांचे समानार्थी शब्द अनुक्रमे -------------

a) सुत, जनक

b) भ्राता, नंदन

c) मिलिंद, रावा

d) शुक, सहोदर

ii) अतिवृष्टी व खंडन या शब्दांचे विरुद्धार्थी शब्द अनुक्रमे ------------

a) अपारवृष्टी, कुंदन

b) अनावृष्टी, मंडन

c) कमालवृष्टी, कंपन

d) अनाववृष्टी, जन्तन

iii) रेडा व खोंड यांचे लिंग बदलल्यास अनुक्रमे उत्तर पुढीलप्रमाणे असेल ----------

a) मेंढी, घोडी

b) शेळी, बेडकी

c) म्हैस, भाटी

d) म्हैस, कालवड

iv) गाणे व मिरी यांचे वचन बदलल्यास अनुक्रमे उत्तर पुढीलप्रमाणे असेल ----------

a) गाणं, मीर

b) गाणी, मि-ये

c) गाणे, मिर्या

d) गायन, मिरया

v) दोनदा जन्मलेला व देव आहे असे मानणारा .... या शब्दसमूहासाठी एक अनुक्रमे पुढीलप्रमाणे असतील -------------

a) द्वितीय, नास्तिक

b) द्विज, आस्तिक

c) दैविक व नैतिक

d) दाद्वीज व कार्मिक

vi) 'चहा करणे' या वाक्प्रचारासाठी अचूक अर्थ पुढीलप्रमाणे असेल -----------

a) स्तुती करणे

Pati's ICSE ACADEMY

Pati's
ICSE ACADEMY



b) निंदा करणे

c) होकार देणे

d) नकार देणे

vii) कोठेही गेले तरी मनुष्यस्वभाव सारखाच' याअर्थी पुढीलपैकी म्हण वापरतात. -----------

a) पाचा मुखी परमेश्वर

b) बळी तो कानपिळी

c) पळसाला पाने तीनच

d) बुडत्याचा पाय खोलात

viii) कित्येकदा समजावूनही त्याच्या लक्षात येत नाही (प्रश्नार्थी करा.)

a) कित्येकदा समजावूनही त्याच्या लक्षात येत नाही का?

b) कित्येकदा समजावूनही त्याच्या लक्षात येते का?

c) कित्येकदा समजावूनही त्याच्या लक्षात येत नाही

d) नेहमी समजावूनही त्याच्या लक्षात येत नाही का?

## SECTION B [40]

### Question 5

Read the extract given below and answer in Marathi the questions that follow. [10]

**खालील परिच्छेद वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे मराठीत लिहा.**

"शांते कार्टे, आहेस तरी कुठं?" पुन्हा आई ओरडली; तशी थरथर कापत शांती पटकन घरात शिरली. पावसात भिजल्याने तिला हुडहुडी भरली होती आणि आई रागावेल या भीतीनेही ती कापत होती. आणि अशा स्थितीतही जमा केलेली एक गार तिने तोंडात टाकली.

शांती तशा स्थितीत घरात शिरली; पण आईला तिची चाहूल लागली नव्हती. आई घरांतून तशीच ओरडत ओटीवर आली, "अरे, तू तरी पाहिलीस का तिला कुठं? कुठं गेली कुणास ठाऊक-"

- <u>दुधावरची साय</u>

प्रश्न :

१. शांती कोण होती ? आईने तिला का ठेवून घेतले ? [2]

२. आईने शांतीला मारायला का सुरुवात केली ? ती त्यावर काय म्हणाली ? [2]

Pati's
ICSE ACADEMY

Pati's
ICSE ACADEMY



३. लेखकाने कोणाला नमस्कार केला ? का ? [3]

४. 'दुधावरची साय' हे शीर्षक पाठास योग्य वाटते का?यावर तुमचे मत लिहा. [3]

## Question 6

Read the extract given below and answer in Marathi the questions that follow. [10]

**खालील परिच्छेद वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे मराठीत लिहा.**

हामजा दबकत दबकत त्या कोट्यापाशी गेला. बुंध्यावर चढला आणि कोटे काढण्यासाठी त्याने हात घातला. तशी एक बारकी चिमणी भुर्रकन् त्यातून उडाली आणि वरच्या डहाळीवर जाऊन बसली. आपली एवढीशी शेपटी नाचवीत चिवचिवू लागली. हामजाने सांगितल्याप्रमाणे तिचा रंग होता.
"अंडी आहेत का रे, हामजा?" आबासने विचारले.
"नाही नाही. आताशी कुठं ती कोटं तयार करायला लागलीय, ते पुरं झालं म्हणजे ती घालील."

- <u>शाळा</u>

प्रश्न :

१. शाळेत जाण्यासाठी दिनूने कशी तयारी केली ? [2]

२. निसर्गाच्या शाळेत जाण्यासाठी मुलांनी कोणती पूर्वतयारी केली होती ? [2]

३. दिनूच्या आईचे मन समाधानाने काठोकाठ केव्हा भरले ? का ? [3]

४. 'हमजा निसर्गाच्या शाळेतील गुरु होता' असे म्हणणे योग्य आहे का ? आपले विचार स्पष्ट करा. [3]

## Question 7

Read the extract given below and answer in Marathi the questions that follow. [10]

**खालील परिच्छेद वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे मराठीत लिहा.**

दादा थोडेसे चक्रावले. समोरचं रजिस्टर बाजूला ठेवत ते म्हणाले, "तुमचं म्हणणं मला पटतंय पण मुलांनी आज सकाळपासून तीन वेळा जेवण घेतलं आहे. त्याशिवाय फळं, बिस्किटं, दूध वेगळं. खाऊन-खाऊन ती सुस्त झाली आहेत. आता पुन्हा काही खातील असं वाटत नाही आणि त्यांच्या प्रकृतीचा विचार न करता त्यांना आग्रह करणं बरोबर नाही."

Pati's
ICSE ACADEMY

Pati's
ICSE ACADEMY



माणिकलाल थोडे चिंताग्रस्त झाले. म्हणाले, "साहेब, कल्पना आहे. पण आम्ही इतक्या दुरून आलोत. चांगल्या भावना घेऊन आलोत. तुम्ही नाही म्हणू नका. थोडं थोडं द्या त्यांना. राहिलेलं नंतर खातील."

- पुण्य

प्रश्न :

१. मानव आश्रमात लोक कशासाठी येत? त्यामागे त्यांचा उद्देश्य काय असे? [2]

२. हिरालालने दादांसामोर कोणता प्रस्ताव मांडला?तो दादांनी का नाकारला? [2]

३. तारुण्यातही आपल्याला वार्धक्य आले, असे दादांना का वाटले ? [3]

४. 'पुण्य' या कथेतून लेखकाला काय सुचवायचे आहे? [3]

Question 8

Read the extract given below and answer in Marathi the questions that follow. [10]

**खालील कवितेच्या ओळी वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे मराठीत लिहा.**

फडताळांत एक गाठोडें आहे त्याच्या तळाशीं अगदी खालीं
जिथे आहेत जुने कपडे, कुंच्या, टोपडीं, शेले, शाली
त्यांतच आहे घडी करून जपून ठेवलेली एक पैठणी
नारळी पदर, जरी चौकडी, रंग तिची सुंदर धानी.

- पैठणी

प्रश्न :

१. आजीची पैठणी कोठे होती? या गाठोडयात अजून काय- काय होते? [2]

२. मऊ पैठणीतून कवयित्रीला काय सुचवायचे आहे? [2]

३.आजीच्या नव्या संसारातील कोणत्या आठवणी या पैठणीने जपल्या आहेत? असे कवयित्री म्हणतात. [3]

४. कवयित्रीने आजीचे चित्रण कसे केले आहे ?तुमच्या शब्दांत लिहा. [3]

Question 9

Read the extract given below and answer in Marathi the questions that follows: [10]

**खालील कवितेच्या ओळी वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे मराठीत लिहा.**

Pati's
ICSE ACADEMY

Pati's
ICSE ACADEMY



वेड्यापिशा ढगाकडून
वेडेपिसे आकार घ्यावे;
रक्तामधल्या प्रश्नांसाठी
पृथ्वीकडून होकार घ्यावे.

- घेता

प्रश्न :

१. 'सह्याद्रीकडून ढाल घ्यावी' असे कवीला का वाटते? [2]

२. ढगांचे आकार वेडेपिसे आहेत कवीला असे का वाटते? [2]

३. 'भरलेल्याशा भीमेकडून तुकोबांची माळ घ्यावी' या ओळींचा अर्थ स्पष्ट करा. [3]

४. 'घेता' हे शीर्षक कवितेस योग्य वाटते का? तुमचे मत लिहा. [3]

Question 10

Read the extract given below and answer in Marathi the questions that follows: [10]

खालील कवितेच्या ओळी वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे मराठीत लिहा.

हिरवें हिरवेंगार शेत हें सुंदर साळीचें
झोके घेतें कसें, चहुंकडे हिरवे गालीचे !
सोनेरी, मखमली, रुपेरी पंख कितीकांचे
रंग किती वर तऱ्हेतऱ्हेचे इंद्रधनुष्याचे.

- सायंकाळची शोभा

प्रश्न :

१. सूर्यास्ताच्या वेळी ओढा आणि झाडे कशी दिसतात? [2]

२. साळीच्या शेताचे वर्णन कवीने कसे केले आहे? [2]

३. अचल फुलपाखरे असे कवी कोणास व का म्हणतो? [3]

४. कवी भा. रा. तांबे यांनी सायंकाळच्या सौंदर्याचे वर्णन कसे केले आहे ? [3]

********************************************************************************

Pati's
ICSE ACADEMY

# Question Paper 3

EuroSchool
Discover Yourself

**MARATHI (II Language)**
**1st Preliminary Assessment, 2025-26**
***(Three hours)***

**Grade: X** **Max Marks: 80**

---

*Answers to this Paper must be written on the paper provided separately.*
*You will not be allowed to write during the first **15 minutes**.*
*This time is to be spent in reading the question paper.*
*The time given at the head of this Paper is the time allowed for writing the answers.*

---

*Attempt **all** questions from **Section A** and **any four** questions from **Section B.***
*You must answer at least **one** question from each of the two books you have studied and **two** other questions.*
*The intended marks for questions or parts of questions are given in brackets [ ].*

---

***Section A (40 Marks)***
***(Attempt all questions from this Section)***

**Question 1**

**Write a short composition in Marathi of approximately 250 words on any one topic**: -

खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर मराठीत सुमारे २५० शब्दांचा निबंध लिहा. **[15]**

**(i)** प्रत्येक शाळेत 'सैनिकी शिक्षण' हे सक्तीचे केले जावे, याविषयी आपले काय मत आहे? देशाच्या रक्षणाची जबाबदारी प्रत्येकाची आहे. त्यादृष्टीने प्रत्येकाने तयारी ठेवणे गरजेचे आहे. निदान सीमेवर असणा-या जवानांविषयी आपणास संवेदना तरी राहतील......

**(ii)** असे म्हणतात की, योग्य वेळी काम पूर्ण केले की नंतरचा घोटाळा वाचतो. वेळीच काळजी घेतली की पुढे येणारे मोठे संकट टळते. एखादे काम नियोजनबद्ध, आखून केले की वेळ वाचतो. तसेच ते काम वेळेत पूर्णसुद्धा होते. त्यामुळे अनेक इतर कामे करण्यास उत्साह प्राप्त होतो. कोणतेही काम करण्यास कंटाळा येत नाही. या विषयी तुमचे अनुभव लिहा.

**(iii)** 'सेल सेल, एका वस्तूवर एक मोफत' -- ७०% सवलत. पावसाळा सुरु झाला, सण आले की आपण या शब्दांच्या मोहात पडतो आणि खरेदीला सुरूवात करतो ही मनोवृत्ती बदलणे गरजेचे आहे. अशा खरेदीची सवय होऊ शकते. गरज नसतांना नको त्या वस्तू घरात येतात. अशा खरेदीचे दुष्परिणाम कोणते होऊ शकतात? - याविषयी आपले मत लिहा.

**(iv)** दहावीच्या बोर्ड परीक्षा बंद झाल्या तर...! कल्पना करून मनात येणारे विचार स्पष्ट करा.

Pati's ICSE ACADEMY

(v) पुढील चित्राचे निरीक्षण करून मनात येणारे विचार किंवा गोष्टीचे वर्णन करा.




**Question 2**

**Write a letter in Marathi of approximately 120 words on the given topic.** **[7]**

खाली दिलेल्या विषयावर सुमारे 120 शब्दांपर्यंतचे एक पत्र मराठीत लिहा:

**(i)** आपण आपल्या मित्र परिवारांबरोबर अनेक वृद्धाश्रमांना भेटी दिल्या. त्यांच्या मनातील कथा, व्यथा जाणून घेतल्या. त्यांचे मनोबल वाढवून आपुलकी, माया, प्रेम, वात्सल्य यांचा वर्षाव केला. त्यांना आनंद देता-देता तुम्हांला आनंद कशाप्रकारे गवसला, याचे हृदयस्पर्शी वर्णन करणारे पत्र गावी असलेल्या तुमच्या आजोबांना लिहा.

**(ii)** आपल्या मराठी भाषेला अमृताची उपमा दिली आहे. मराठी साहित्यातील नामवंत लेखक आणि कवी मंडळी यांचे जीवन व लेखन प्रवास तसेच त्यांच्या प्रसिद्ध कथा, कादंबरी, काव्य इत्यादी वाङ्मय साहित्याची ओळख मालिकांद्वारे (Serial) किंवा कार्यक्रमाद्वारे सर्वसामान्य जनतेसमोर दर्जेदार रितीने सादर होणे गरजेचे आहे, असे आपणांस वाटते. याविषयी विनंती करणारे पत्र एका नावाजलेल्या टी.व्ही. वाहिनीच्या (Channel) अधिका-यास लिहा.

**Question 3**

**Read the passage given below and answer in Marathi the questions that follow, using your own words as far as possible.**

खालील उतारा काळजीपूर्वक वाचा आणि त्यावर आधारलेल्या प्रश्नांची उत्तरे स्वत:च्या शब्दांत मराठीत लिहा. (प्रस्तावना आवश्यक)

काही पुस्तके आपल्याला झपाटून टाकतात. अंतःकरणात भावनांची प्रचंड खळबळ उडवून देण्याची त्यांच्यात शक्ती असते. अशी पुस्तके कधी विसरता येत नाहीत. दीर्घकाळ टिकणा-या सुगंधाप्रमाणे ती पुस्तके मनात दरवळत राहतात. उत्तम साहित्यकृतींचे वाचन करत राहणे यासारखे दुसरे उत्तेजक आणि आनंददायक काही असेल का? शेक्शपिअरच्या मॅगबेथ आणि किंग



Pati's ICSE ACADEMY

लिअर या नाटकांतले काही संवाद इतके काव्यात्म, इतके अर्थगर्भ आणि इतके भावस्पर्शी आहेत, की प्रत्येक वाचनाच्या वेळी अधिक उत्कट अनुभूती देत राहतात. अशा वाचनाची नशा काही औरच असते.

सुखाविषयीच्या माझ्या कल्पनेतून पुस्तके वगळली तर सारं सुखच संपुष्टात आलं असं म्हणावं लागेल. जवळचे मित्र दुरावतात. ज्यांच्यावर प्रेम केलं त्यांनाही त्या प्रेमाची विस्मृती होते आणि वैराचा अग्नी ते पेटवत ठेवतात. हातात आलेला पैसा कसा आणि केव्हा नाहीसा होत असतो. पण पैसा आणि माणसे यांच्याप्रमाणे पुस्तके कधीच विश्वासघातकी असत नाहीत. त्यांना स्पर्श करण्याचा अवकाश, भावनांनी आणि विचारांनी ओसंडणारे आपले अंतःकरण ते उघडे करतात. 'माझ्या अंतरंगात त्या थोर लेखकानं साठवलेलं हे भांडार तुझंच आहे. जे आवडेल ते खुशाल घेऊन जा' असंच जणू ते सांगत असतात.

पुस्तकांवर आत्यंतिक प्रेम करणारी माणसं मी पाहिली आहेत. आपल्या कपाटात जिवापाड जपून ठेवलेलं पुस्तक दुस-याला देताना ती अगदी व्याकूळ झालेली असतात. ते देताना तो ग्रंथप्रेमी आपल्याला सांगतो, "अतिशय काळजीपूर्वक वापरा. दुसऱ्याच्या हाती देऊ नका. पुस्तकाची पानं मुडपू नका. कोणताही मजकूर पेन्सिलीने किंवा शाईने अधोरेखित करू नका, वरचे कव्हर काढू नका. तिस-या दिवशी कटाक्षाने मला पुस्तक परत करा." त्या सूचना आपल्याला अपमानकारक वाटाव्यात का?

<u>प्रश्न:</u>

- **a** 'काही पुस्तकं आपल्याला झपाटून टाकतात.' असे लेखक का म्हणत असतील? [2]
- **b** 'वाचनाची नशा काही औरच असते.' असे कोणत्या पुस्तकांबाबत म्हटले असावे? [2]
- **c** पुस्तके कधीच विश्वासघातकी असत नाहीत' ही म्हणणे योग्य आहे का ते पटवून दया. [2]
- **d** पुस्तकांवर आत्यंतिक प्रेम करणारी माणसे कशी असतात व कोणत्या सूचना करतात? [2]
- **e** आपण वाचलेल्या कोणत्याही एका पुस्तकाबद्दल चार-पाच ओळी लिहा. तसेच ते पुस्तक तुम्हाला का आवडले ते सांगा. [2]

**Question 4**

**Answer the following according to the instructions given:**

**खालील दिलेल्या सूचनेनुसार प्रश्नांची उत्तरे लिहा.** **[8]**

**(i)** खिडकी बायका या शब्दांचे वचन बदल अनुक्रमे ...

**a** गवाक्ष, स्त्रि     **b** खिडक्या, बाई

**c** खिदक्या, आमंत्रित     **d** खिडक्या, मुली



ICSE ACADEMY

**(ii)** खालील वाक्यांतील अव्ययाचा प्रकार ओळखा. (अ) तो मुलगा कसाबसा चालत होता.
(आ) माझा मित्र आणि मी उशिरा घरी आलो.

**a** उभयान्वयी अव्यय व क्रियाविशेषण अव्यय **b** क्रियाविशेषण अव्यय व उभयान्वयी अव्यय
**c** शब्दयोगी अव्यय व केवलप्रयोगी अव्यय **d** शब्दयोगी अव्यय व संबंधवाचक अव्यय

**(iii)** खालीलपैकी अयोग्य शब्दगट ओळखा.

**a** मोद, आनंद, संतोष, हर्ष **b** गर्व, तोरा, ऐट, रुबाब
**c** आकाश, गगन, आभाळ, शशी **d** संगर, लढाई, युद्ध, समर

**(iv)** (अ) काही त्रासदायक रुढी नष्ट होणेच योग्य आहे. (आ) पोलिसांनी आरोपीने बोलावे म्हणून खूप प्रयत्न केले. – या वाक्यांसाठी कोणती वाक्प्रचारांची जोडी योग्य ठरेल?

**a** पायमल्ली करणे आणि काट्याने काटा काढणे **b** ऱ्हास होणे आणि जंग जंग पछाडणे
**c** वठणीवर आणणे आणि भडाभडा बोलणे **d** कान फुंकणे आणि उदक सोडणे

**(v)** 'सुट्टीत भरपूर वाचन करावे.' - या वाक्याचे नकारार्थी ओळखा.

**a** सुट्टी भरपूर वाचन करू नये असे नाही. **b** सुट्टीत अगदी कमी वाचन करू नये.
**c** दोन्ही वाक्ये बरोबर **d** दोन्ही वाक्ये चूक

**(vi)** पुढील वाक्यांचा प्रकार ओळखा: (अ) मुलांनो रांगेत चला.
(आ) बापरे! किती वाईट वागला तो आपल्याबरोबर.

**a** आज्ञार्थी वाक्य, उद्गारार्थी वाक्य **b** विधानार्थी वाक्य, नकारार्थी वाक्य
**c** प्रश्नार्थी वाक्य, होकारार्थी वाक्य **d** उद्गारार्थी वाक्य, प्रश्नार्थी वाक्य

**(vii)** पक्षिणी थोरली या शब्दांचे लिंग बदल अनुक्रमे ...

**a** पक्षीण, ठोरला **b** पक्षि, मोठा
**c** पक्षी, थोरला **d** खग, महान

**(viii)** खालील वाक्यांचा काळ ओळखा. (अ) सर्वकाही तुझ्या मनाप्रमाणे घडेल.
(आ) साधूने राजाला आशीर्वाद दिला.

**a** वर्तमानकाळ व भविष्यकाळ **b** भविष्यकाळ व वर्तमानकाळ
**c** भविष्यकाळ व भूतकाळ **d** भविष्यकाळ व भविष्यकाळ

## Section B (40 Marks)

***Attempt four sets of questions from this Section.***

*You must answer at least* ***one*** *question from each of the two books you have studied and* ***two*** *other questions.*

**काव्यांगण**

**Question 5** माझा मराठीचा बोल

**Read the stanza given below and answer in Marathi the questions that follow:**

खालील कवितेच्या ओळी वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे मराठीत लिहा:

"हिरव्या पिवळ्या माळावरून हिरवी पिवळी शाल घ्यावी"

i सह्याद्रीकडून ढाल घ्यावी असे कवीना का वाटते? [2]

ii ढगांचे आकार वेडेपिसे आहेत असे कवी का म्हणतात? [2]

iii पिसाळलेली आयाळ व मानव यासंबंधी कोणते साम्य कवी सांगतात? [3]

iv 'घेता घेता एक दिवस देणा-याचे हात घ्यावे' – अर्थ स्पष्ट करा. [3]

**Question 6** भारूड: विंचू चावला

**Read the stanza given below and answer in Marathi the questions that follow:**

खालील कवितेच्या ओळी वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे मराठीत लिहा:

"मनुष्य इंगळी अति दारुण। मज नांगा मारीला तिनें।
सर्वांगी वेदना जाण। त्या इंगळीची॥"

i संत एकनाथांच्या मते त्यांना कोणता विंचू चावला? त्याचा कोणता परिणाम झाला? [2]

ii विंचू दंशाच्या वेदनेतून संत एकनाथांनी मुक्ती कशी मिळवली? [2]

iii किंचित राहिली फुणफुण म्हणजे काय? ती कशी दूर करावी? [3]

iv 'विंचू चावला' या भारुडातून संत एकनाथ काय सांगू इच्छितात? [3]

**Question 7** पालखीचे भोई

**Read the stanza given below and answer in Marathi the questions that follow:**

खालील कवितेच्या ओळी वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे मराठीत लिहा:

'पालखीचे भोई आम्ही पालखीचे भोई
पालखीत कोण? आम्हां पुसायचे नाही!'

i भोयांच्या कष्टाळू जनतेच्या शोषिकतेचे दर्शन या कवितेतून कसे घडवते? [2]

ii भोयांची सोयरीक कशी जुळते? [2]

iii भोई 'देणा-याचं ओझं का मानत नाहीत?' [3]

iv भोयांना पालखीचा दांडा कधी जड वाटतो? [3]

**रंगस्पर्श**

**Question 8** चार दिवस

**Read the extract given below and answer in Marathi the questions that follow:**

खालील परिच्छेद वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे मराठीत लिहा:

**मराठे: हा भोळ्या तिच्या घराजवळच राहतो.**

**देशपांडे: (भोळ्याकडे रोख वळवीत) मग का रे गेला नाहीस तू?**

i शकू दिसायला व स्वभावाने कशी होती? तिच्याविषयी ऑफिसमध्ये चर्चा का रंगली? [2]

ii गेले चार दिवस शकू ऑफिसला का येत नव्हती? तिच्या अनुपस्थितीत तिच्या सहका-यांना ऑफिस कसे वाटत होते? का? [2]

iii आपल्या नव्या नोकरीविषयी कोणती माहिती शकूने आपल्या सहका-यांना दिली? [3]

iv 'आता मी आता खूप सुखी होणार आहे' असे कोण म्हणाले? का? [3]

**Question 9** विठ्ठल तो आला आला

**Read the extract given below and answer in Marathi the questions that follow:**

खालील परिच्छेद वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे मराठीत लिहा:

**विठ्ठल: तुम्ही माझ्या जागेवर या आणि मी तुमच्या जागेवर जातो ......**

i 'आम्हाला जनावरं म्हणायचा तुम्हाला काय अधिकार'- कोण, कोणास, का म्हणाले? [2]

ii यावर डॉक्टरांची प्रतिक्रिया काय होती? [2]

iii देवळातील प्रसंग पाहता डॉक्टरांची प्रतिक्रिया योग्यच होती. हे विधान स्पष्ट करा. [3]

iv 'तुम्हाला गाढव म्हणण्यानं अब्रू गेली गाढवाची' असे डॉक्टर कोणास उद्देशून म्हणाले? प्रस्तुत उद्गार कितपत योग्य आहेत? आपले मत मांडा. [3]

**Question 10** अबोल झाली सतार

**Read the extract given below and answer in Marathi the questions that follow:**

खालील परिच्छेद वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे मराठीत लिहा:

दामू: (टेबलावरची बैठक मोडून समोर येत) आम्ही काय वर्णन करायचं वहिनी? प्रतिभाशाली लेखकांना सुद्धा शब्दांच्या अर्थातला तोकडेपणा जाणवावा असले प्रसंग हे! रमेश भैय्यांच्या नुसत्या नखाचा एवढा पराक्रम हं!

i विख्यात सर्जन डॉक्टर इंदूरकर यांच्यावर कोणता उल्कापात झाला होता? का? [2]

ii एक कलाकार म्हणून दामूच्या मनात रमेशविषयी कोणत्या भावना होत्या? [2]

iii सवत असणा-या सतारीस सविता स्वतःकडे आनंदाने ठेवून घेण्यास का तयार होते? [3]

iv सवितेच्या मनात डॉक्टरांविषयी कोणता संशय होता? हा संशय कोणी दूर केला? कसा? [3]

********************

Pati's
ICSE ACADEMY

# Prepare for ICSE CLASS 10
# Marathi

## Free Resources

## SCAN QR CODE Now

**Scan QR code** for Free Access to
500+ Prelim Papers across 20 subjects

